



म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ९२८४

REFBK-0021140
REFBK-0021140

२९१८० काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# गीत शाकुंतल

(सुबोध गीतमय शाकुंतल)

कवि

'गिरिबाल'

2248 का104
27980

प्रस्तावना

महाराष्ट्रकवी – यशवंत दिनकर पेण्ढरकर

REFBK-0021140
REFBK-0021140

साहित्य साधना प्रकाशन,
स्वामी रामानंद तीर्थ मार्ग, औरंगपुरा, औरंगाबाद

© कवि गिरिबाल (कृ. व्यं. हवालदार)

प्रथमावृत्ती / ८ एप्रिल १९७६

मूल्य / नऊ रुपये

प्रकाशक / ना. वि. देशपांडे

साहित्य साधना, स्वामी रामानंद तीर्थ मार्ग

२–८–७९ औरंगपुरा, औरंगाबाद

मुद्रक / ज. रा. बर्दापूरकर

जयहिंद प्रिंटिंग प्रेस, औरंगाबाद

## प्रारंभी —

महाकवी कालिदासाच्या जगप्रसिद्ध 'अभिज्ञान शाकुंतल' या नाट्यकृतीची कथा गीतरूपात रसिकांना सादर करताना मला आनंद होत आहे. बालपणापासूनच मला स्वरगंगेत न्हाऊन जाण्याची स्वभावतःच आवड. शद्ब व स्वर यांची सांगड घालून आपणही गीते लिहावी असे वाटले. माझ्या प्रारंभीच्या प्रयत्नांना माझ्या प्राध्यापकांनी व मित्रांनी प्रोत्साहन दिले. पुढे कै. वसंत देसाई, सुधीर फडके, यशवंत देव, श्रीनिवासराव खळे, आर. एन. पराडकर यांसारख्या या क्षेत्रातील मान्यवरांचा परिचय झाला. त्यांनी पाठराखण केली. यांमुळे माझ्या गीतलेखनाला गती आली. भारतीय पातळीवर झालेल्या आकाशवाणीच्या समरगीत–लेखनस्पर्धेत १९६५ साली पारितोषिक मिळाले. काही गीतांच्या ध्वनिमुद्रिकाही झाल्या. त्या लोकप्रिय झाल्या. गीतकार म्हणून मला घडविण्यास कारण झालेल्या या सर्व मान्यवरांचा ऋणाईत राहण्यातच मला आनंद आहे.

'गीत शाकुंतल' ही मी लिहिलेली गीतकथा प्रथम नांदेड येथील श्री. ग. ना. अंबेकर यांनी त्यांच्या 'प्रतोद' या नियतकालिकात क्रमशः प्रसिद्ध केली. यावेळी प्रा. नरहर कुरुंदकर व प्रा. राम शेवाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. माझे गायक–मित्र श्री. मधुसूदन भावे ह्यांनी यातील काही गाणी गायिली. त्यानंतर श्री. नाथराव नेरळकर व श्री. कमलाकरराव परळीकर ह्यांनी ह्या गीतांना स्वरबद्ध करण्याचा प्रयत्न केला. ह्या सर्वांचा मी कृतज्ञ आहे.

माझ्या या प्रयत्नांना अनेकांचे आशीर्वाद मला प्रेरक ठरले आहेत. या गीत कथेला 'सुबोध गीतमय शाकुंतल' असे कै. वसंत देसाई

ह्यांनी नाव सुचविले. त्यांची स्मृती म्हणून तेच कायम ठेवले आहे. मा. कृष्णराव चोणकर ह्यांनी आस्थेने सतत चौकशी केली. महाराष्ट्रकवी 'यशवंत' ह्यांनी प्रस्तावना लिहून आशीर्वाद दिले आहेत. त्यांचा आशीर्वाद मला या क्षेत्रातील वाटचाल करण्यास सदैव प्रेरक ठरला आहे. त्यांच्या ऋणातून मी मुक्त होऊ शकणार नाही.

या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी साहित्य-साधना या प्रकाशन संस्थेने स्वीकारली. या कामी मला माझे स्नेही श्री. ना. वि. देशपांडे व डॉ. प्रभाकर मांडे यांचेही साहाय्य लाभले. मराठवाड्यातील प्रसिद्ध चित्रकार श्री. धर्मराज भोईर यांनी मुखपृष्ठ सजावट अल्पावधीत करून दिली. जयहिंद मुद्रणालयाचे श्री. ज. रा. बर्दापूरकर व त्यांचे सहकारी ह्यांनी सुबक मुद्रण करून दिले. या सर्वांचा मी आभारी आहे.

औरंगाबाद
दिनांक ८ एप्रिल १९७६

क्रु. व्यं. हवालदार
(गिरिबाल)

२२८४ काव्य
२११४०

जागरूक काव्यप्रेमी मराठी वाचकांस कवी गिरिबाल यांची ओळख करून द्यायला नको. विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असलेली त्यांची कविता रसिकांच्या नजरेखालून गेली असेलच. तथापि संग्रहित स्वरूपात काव्य हाती आले म्हणजे वाचक त्याचे मूल्यमापन अधिक साक्षेपाने करू शकतो.

आज गिरिबाल 'गीतमय सुबोध शाकुंतल (गीत शाकुंतल)' ही आपली काव्यकृती वाचकांस सादर करीत आहेत. नावातच त्यांच्या काव्यकृतीचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. 'शाकुंतला'ची कथा गीतांतून सुबोध रीतीने इथे गोविली आहे, हाच इत्यर्थ.

शकुंतलेच्या कुळकथेकडे ते जिज्ञासूपणे वळलेले दिसत नाहीत. दुष्यंत राजा शिकारीच्या नादात कण्वऋषीच्या आश्रमापाशी येऊन पोचला असताना, हरिणशावकाची हत्या त्याने करू नये म्हणून त्याला आश्रम-वासीयांनी विनविले. कण्वमुनी त्यावेळी आश्रमात नव्हते. आश्रमात शकुंतलेखेरीज कोणी नसल्यामुळे दुष्यंताला हीच भेटली. पहिल्याच भेटीत ( Love at first sight म्हणतात त्याप्रमाणे ) दोघेही परस्परांवर अनुरक्त झाली. शकुंतलेची आई मेनका ही अप्सरा. तेव्हा ही देखील अप्सरेसारखीच लावण्यवती होती. तेव्हा राजा तिच्यावर अनुरक्त झाला,

ह्यात नवल नाही. पुरुष स्वभावतःच शिकारी, त्यातून तो राजा; आणि शिकारीसाठीच वनात आलेला! प्रकृतिधर्माचा विजय झाला. तथापि शकुंतला एकदम त्याला वश झाली नाही. आपल्या पुत्रास यौवराज्याभिषेक व्हावा ही अट तिने व्यक्त केली. राजाने ती मान्य केली आणि मग त्यांचा गांधर्व विवाह झाला. राजधानीस गेल्यावर, तुला घेऊन जाण्यासाठी लवाजमा पाठवतो असे दुष्यंताने आश्वासन दिले आणि तो निघून गेला.

आश्रमात कण्व परतल्यावर त्याला झाला प्रसंग समजला आणि त्याने अनुमोदन दिले. पण पुढे बरेच दिवस गेले तरी, शकुंतलेला घेऊन जाण्यासाठी दुष्यंत आला नाही किंवा लवाजमाही आला नाही. यथाकाळ शकुंतला प्रसूत झाली आणि तिला पुत्र झाला. बराच काळ वाट पाहून राजाकडून काहीच खबर न आल्यामुळे, यौवराज्याभिषेकासाठी शकुंतला व भरत यांना कण्वाने शिष्यांच्या सोबतीने दुष्यंताकडे पाठविले. पण दुष्यंताने जनलज्जेस्तव हिचा व आपला संबंध नसल्याचे दर्शवून हिची निर्भर्त्सनाही केली. तेव्हा, 'भरत तुझ्याशी वैर धरून सर्व राज्य आक्रमील' असा शाप देऊन शकुंतला निघून चालली. इतक्यात आकाशवाणीने दुष्यंतास हिचा व पुत्राचा स्वीकार करण्यास सांगून लोकापवादाचा निरास केला. ( वायुपुराण २–३७–१३१ ). आपण अव्हेर केला तो लोकापवादास्तव केला अशी दुष्यंताने शकुंतलेची समजूत घातली आणि जनतेचे समाधान केले. ( महाभारत आदिपर्व ८९–१०० भागवत ९–२० ) अशी कथा 'प्राचीन चरित्रकोशात' दिली आहे.

पण ह्या कथेत नाट्य नाही. ह्या कथेच्या आधारे नाटक तयार करण्यास काही कल्पिताचा आश्रय करावा लागणार. प्रतिभावंताला ते शक्य होते. कविश्रेष्ठ कालिदासाचे ' अभिज्ञान शाकुंतल ' नाट्यमय झाले आहे. दुर्वासाचा शाप, शक्रावतारी अंगठी हरवणे, राजाची विस्मृती, मत्स्य-गर्भातील अंगठीमुळे झालेले स्मरण इत्यादी प्रकारांनी कथेत नाट्य आले आहे. प्राचीन चरित्रकोशकारांनी असे नमूद केले आहे की

पद्मपुराणाच्या बंगाली प्रतीत कालिदासाच्या कथानकाशी जुळती कथा आहे.

गिरिबाल यांच्या गीतमय शाकुंतलाने कालिदासाच्या नाट्यकृतीचा आश्रय केलेला दिसतो. मराठी वाचकाला कथा माहीत आहे ती कालिदासाच्या नाटकातली. तेव्हा गिरिबालांनी त्या सूत्रात आपल्या गीतमौक्तिकांची माला गुंफावी हे स्वाभाविक आहे. परिचिताचा अनुकार उपकारक ठरतो. तशात गिरिबाल आधीच सुबोध काव्यरचनेने वाचकांना विश्रुत आहेत. त्यांच्या त्याच गुणाचा येथेही प्रत्यय येतो. यांतील सर्व पद्यरचना सुबोध आहे, प्रासादिक आहे आणि कवि-प्रकृति धर्मास अनुसरून त्यांनी वेचक रसमय प्रसंग तेव्हढेच गायिले आहेत. नाटकात शकुंतलेला दुष्यंताच्या प्रासादात पोचती केली तेव्हा ती गर्भवती होती. आणि वायुपुराणातील कथेत ती पुत्रवती झाल्यावरच दुष्यंताकडे तिची रवानगी करण्यात आली असे म्हटले आहे. हा फरक आहे. पण गांधर्व विवाहाला साक्षी कोणीच नसल्यामुळे गर्भवतीचा त्याग करण्यात कारुण्य अधिक आहे, वंचना असह्य आहे. खुणेची अंगठी सापडणे किंवा आकाशवाणीने ग्वाही देणे ह्यामुळेच कथेचे पर्यवसान शुभंकर झाले आहे.

प्रस्तुत प्रकारची काव्यरचना भावगीतकाराला मानवणारी आहे. कथनात्मक काव्यात, टाळायचा म्हटला तरी, थोडासा तरी गद्यसदृश भाग येणे अपरिहार्य असते. पण अशा रचनेत तो टाळला जातो; आणि वाचकाला कथा तर उपलब्ध होते. भावगीतांच्या गुंफणीने कथा सांगायची कल्पना 'जयमंगला' ह्या काव्यापासून अवतरली. या काव्यकथेचा विशेष हा की ती 'एकपात्री' आहे— म्हणजे सर्व भावगीते प्रेमिक नायकाच्या मुखाने वदविली आहेत. या प्रयोगाचा अनुकार कोणी केलेला आढळत नाही. गिरिबालांच्या प्रस्तुत काव्यकृतीचे गोत्र श्री. माडगुळकरांच्या गीत-रामायणाचे आहे. गीतरामायणाची पद्धत मराठी काव्यप्रांतात अनुकरणसुलभ

झालेली दिसते. गीत गोपाळ, गीत शिवायन, गीत रामकृष्णायन, शिवस्वप्न (कवी प्रफुल्ल दत्त) अशा काही काव्यकृती वाचकांना ह्या अनुषंगाने आठवतील व अशा रचनेत प्रत्येक गीत सुटे स्वतंत्र असते; तरी पण कथेचा धागा जोडून देण्यासाठी काही गद्य प्रास्ताविकांची गरज पडते. गिरिबालांच्या ह्या प्रयोगात तसल्या प्रकारच्या प्रास्ताविकाची जरुरी न पडावी, अशारीतीनेच त्यांनी रचना केली आहे.

गायकांना वाद्यवादकांच्या साह्याने ह्या काव्यकथेचे गायन करणे सुलभ जाते. सामान्यतः कविता रसिकांच्या कानी जाणे आवश्यक असते. मग ती ओवी–अभंगात्मक असो किंवा आर्या–दिंडी–श्लोकांची असो. कथा-कीर्तनांनी तेच काम केले. शाहिरांनी, फड उभारून आपली रचनाही श्रोत्यांच्या कानी घातली. केवळ ग्रंथरूपाने तिचा बोलबाला होण्याला बराच कालावधी लागतो. गिरिबालांच्या या गीतमय शाकुंतलाला गायक–वादकांच्या संचाने उचलून धरले तर अधिक यशःप्राप्ती होईल. त्या यशाचे ते धनी होवोत हीच इच्छा. ही इच्छा व्यक्त करण्याइतकी त्यांची ही काव्यनिर्मिती सरस आहे.

पुणे–३०

– यशवंत दिनकर पेण्ढरकर

## वैखानस ऋषी : १

आवर शर तव आवर नृपते ! ॥ धृ ॥

निरपराध रे हा मृगशावक
तू दीनांचा सदैव पालक
हत्या करी का कधी प्रतिपालक
प्रतिपाळाशी अभय जागते ॥ १ ॥

चपल मृगापरी चपल वारू हे
चपल तुझें पौरुष खुले हे
मृगयेवर तंव दृष्टी राहे
जरी सर्व हे शोभुन दिसते ॥ २ ॥

शरीर मृगाचे फुलासारखें
भिडता त्यांतें तीर नेमके
गमे अग्नी जणुं फुलांत भडके
सावर थोडे साहस भलते ॥ ३ ॥

आश्रमवासी आम्ही मुनीजन
दया मागतो तुजशीं दयाघन
तपोभूमिचें करी संरक्षण
मृगयेस्तव जरी बाहुं स्फुरते ॥ ४ ॥

समीप राहती कण्व कुलपती
दर्शन जा घे त्यांचें नृपती
तपोवनांतील पावन वसती
पावित्र्यानें पौरुष खुलते ॥ ५ ॥

## दुष्यंत :                                                    २

शुभद कोणता शकून या इथें घडायचा || धृ ||

आश्रमासमीप या
स्फुरत बाहुं कासया
अर्थ यातला मला कसा बरे कळायचा || १ ||

शांत हे तपोवन
शांत ही तसें मन
आश्रमांत शांत या लाभ काय व्हायचा || २ ||

वसंत वैभवांत या
गंधल्या वनांत या
हर्षल्या मनीं शकून कोणता फुलायचा || ३ ||

येथ वृक्षवल्लरी
कांहीं सांगती तरी
या अशब्दतेंत भाव कोणता असायचा || ४ ||

अभय पाडसें किती
नयन बोलकें अती
सार्थ पाहती परंतु अर्थ ना कळायचा ॥ ५ ॥

मनोज्ञ सर्वहि कसें
आसमंत हे दिसे
संभ्रमांत एकटाच मी किती रहायचा ॥ ६ ॥

आश्रमांत ना मुनी
भोंवतीहि ना कुणी
शकून मी कुणा पुसूं कोणता घडायचा ॥ ७ ॥

दूर सारथी रथ
दूर राहिला पथ
एकटा वनांत मी असा किती फिरायचा ॥ ८ ॥

## शकुंतला व सख्या ३

शकुंतला : हे वल्कल रुतते घट्ट उरीं
अनसूये ! सखी कर सैल तरी
ही खट्याळ सखी गं प्रियंवदा
करी असें कांहिंसें सदाकदा

प्रियंवदा : कां दोष उगा मज देशी अशीं
यौवनास अपुल्या सांग कशीं

शकुंतला : मी बकुलापाशीं सहज खडी
ही मिष्कील दवडी मुळी न घडी

प्रियंवदा : मज दिसलें किती अनुरूप असें
ही वनज्योत्स्नेपरी भासतसे
हे उचित बोल लावण्यलते
कां लटके रुसणें तुज सुचते
हे रसरसले यौवन गं ऽ
सखि ! कोणासाठीं फुलले गं

शकुंतला : मी वृक्षलतांना घाली पाणी

प्रियंवदा : सखी, भ्रमर रसज्ञ छळेल कुणी

शकुंतला : मी भ्याले, भ्याले भ्याले गं ऽ ऽ ऽ

प्रियंवदा : सखी ! राजा असतो रक्षक गं
मी म्हणते, दुष्यंतास पुकार
गं अभयदान त्याचा अधिकार
कां दोष उगा मज देशीं अशीं
तूं प्रीय प्रीय मम सखी अशी

## नवमालिकेवरील भ्रमर ४

सख्या रंगल्या होत्या तीघी मुक्त विहारांत
दृश्य मनोहर भुलवी, भुलला राजा दुष्यंत ॥ धृ ॥

श्रवणीं येई हास्य मोकळें चष्टेनेंयुक्त
झाला राजा बघतां बघतां सहजची अनुरक्त
नयनां पुढती उभें ठाकलें शकुन मूर्तीमंत ॥ १ ॥

नाजुक मादक सौंदर्यानें यौवन रसरसलें
बसल्या ठायीं पौरुष थोडे न कळत थरथरलें
मनोज्ञ ऐसें दृश्य पाहतें उभें आसमंत ॥ २ ॥

भान न कसलें, तापसकन्या रत अपुल्या कामी
भान न उरलें, कर्तव्यच्युत हा बनला स्वामी
नगराहुनहि तपोभूमी ती वाटे गुणवंत ॥ ३ ॥

भिजल्या वेली भिजलें तरूवर कोमल हस्तांनी
भिजलें काळीज दुष्यंताचें मादक हास्यांनी
अनुरागांनी भिजलें पौरुष तसें पुण्यवंत ॥ ४ ॥

आनंदानें मीही वेडा करीत गुंजारव
शकुंतलेच्या मुखासमिपसें जाऊं पाहे लव
ते भ्यालेलें कटाक्ष पाहुन प्रगटे दुष्यंत ॥ ५ ॥

हंसली सुमनें हंसलें तरूंवर थयथयल्या वेली
हंसले यौवन हंसली प्रीती भयभित झालेली
औचित्यानें आशीर्वच दे मूक आसमंत ॥ ६ ॥

हे विकार नवखे जडलें कां ?
सांग मना तुज कळलें कां ॥ धृ ॥

मुक्तपणानें असता विहरत
मधुप एक मज आला छेडीत—
वा कांहींसें मजला सुचवित
सांग मना तुंज कळलें कां ॥ १ ॥

कोण बरे रे ते राजर्षी !
भी भ्यालेली पाहुन मजशीं
रूप मोहवी या नयनाशीं
सांग मना तुंज कळलें कां ॥ २ ॥

राजर्षींचें होता दर्शन
मूक जाहली वाचा लाजुन
मीच काय वा गेलें बदलुन
सांग मना तुंज कळलें कां ॥ ३ ॥

संभाषणीं कां सख्या रंगल्या
जन्मकहाणी माझी वदल्या
राजर्षींच्यासवें हांसल्या
सांग मना तुंज कळलें कां ॥ ४ ॥

मनीं तयांच्या काय असावे
कसें मला पण ते उमजावे
माझ्या परी कां मी समजावे
सांग मना तुंज कळलें कां ॥ ५ ॥

सख्या बोलती राजा बोले
तृप्त कान पण माझें झाले
चरण दोन्हीहि गती विसरले
सांग मना तुज कळलें कां ॥ ६ ॥

पर्णकुटीप्रत निघतां निघतां
कसा बहाणा अवचित सुचला
दर्भांकुर या पायीं सलतां
सांग मना तुंज कळलें कां ॥ ७ ॥

या श्रवणीं ते भाष्य रंगलें
या नयनीं ते रूप गुंतलें
या हृद्‌कोषीं भाव मधुरलें
सांग मना तुज कळले कां ॥ ८ ॥

## दुष्यंत : ६

किती दीन झाली माझी सखी म्लान झाली
व्यथा अंतरींची माझी, हिंची ना निराळी ॥ धृ ॥

माय मेनकेनें त्यजिलें जन्म देउनीया
मायतात होऊनी देती मुनी कण्व छाया
सख्या दोन हिचियासंगें सदा सर्वकाळीं ॥ १ ॥

इथें तरू वेलीसंगें वाढली असें हीं
हरीण शावकांचें संगें खेळली असेंही
आश्रमांत तापसकन्या म्हणुनी वाढलेली ॥ २ ॥

हिंच्या रूप लावण्यानें मला मोहवीलें
मनीं प्रेम माझ्या येथें हिनें जागवीलें
गती हिच्या प्रीतीमध्यें असें गुंतलेली ॥ ३ ॥

प्रेमविव्हला ही शीळातलावरी झोपे
जरी पुष्पशय्या लाभे, हिचें हास्य लोपे
फिकी फिकी वाटे कैशी हिची ओष्ठ लाली ॥ ४ ॥

जरी लताकुंजाखालीं सुगंधीत वारा
कामविकारानें हिचिया गांजिलें शरीरा
चित्त एक चिंतनकरीता जाहली अबोली ॥ ५ ॥

कमलपत्र घेऊनी वारा सख्या घालतात
उष्ण उष्ण लहरी तरीहि काय स्पर्शतात
व्यथा अंतरींची सांगे सखी लाजलेली ॥ ६ ॥

'मला भेटवां राजर्षी' एवढेच बोल
पालवून गेलें माझ्या मनीं हर्षवेल
शद्ध रूप होता प्रीती—रक्तीमा कपोलीं ॥ ७ ॥

शाकुंतला : ७

मज कांहींच कळेना ॥ धृ ॥

तरूलतानों ! मी बावरलें
प्रीय सख्यानों ! मी बावरलें
बावरलें मी हरीणशावका–मज कांहींच सुचेना ॥ १ ॥

तुम्ही न बाबा ऐशा समयी
विकार कांहीं जडलें ह्रदयीं
नजरे पुढतीं उभें ठाकलें रूप मुळीच ढळेना ॥ २ ॥

आजवरीचें हेंच तपोवन
मला भासते गेलें बदलून
मीच बदललें काय सख्यानों मज कांहींच कळेना ॥ ३ ॥

वसंत वैभव फुललें भवती
आश्रमांत या आला अतिथी
माझ्याहुनहि उचित अर्पिण्या त्याशी, कांही मिळेना ॥ ४ ॥

हंसरें पौरुष होते फुललें
सुगंधलें कौमार्य उमललें
नजरेपुढुनी वनज्योत्स्नेंचें मीलन कांहीं हटेना ॥ ५ ॥

समीप माझ्या पौरुष हंसतां
प्रेमभाव दो हृदयीं फुलतां
कृतार्थ झाल्या मीलनांत कां प्रणयाच्या भावना ॥ ६ ॥

निघतां नृपती वदलें मजशीं
राजमंदिरीं नेईन तुजशीं
आणि मुद्रिका देऊनी करीती प्रीतीची याचना ॥ ७ ॥

करांगुलीतीलं तीच मुद्रिका
प्रसंग स्मरवी एक सारखा
तरुंलतांनों ! प्रीय सख्यानों ! मज कांहींच्च कळेना ॥ ८ ॥

## दुर्वास : ८

मूढे ! ज्याचे करीशी चिंतन
तो तर जाईल तुजला विसरून ॥ धृ ॥

आश्रमकन्यें पर्णकुटीशीं
आलो, अतिथी विसरून जाशीं
कोप अनावर होता माझा
क्रोध अग्नींच्या वर्षील राशी ॥ १ ॥

आश्रमकन्ये ! आतिथ्याच्या
विसरलीस कां इथल्या रीती
दुर्वासच मी हांक मारीतो
परी न येई श्रवणीं कां ती ॥ २ ॥

आश्रमाकन्ये ! अवमानच हा
घाली माझ्या क्रोधा फुंकर
आणिक धगधगत्या वाणींतुन
शाप मिळें तुज असा भयंकर ॥ ३ ॥

" मूढे ! ज्याचें करीशीं चिंतन; तो तर जाईल तुजला विसरून."

## प्रियंवदा : ९

क्रोधावेगें काय दिला हा सखीस असला शाप
मुनीवरा ! द्या कांहीं उःशाप ॥ धृ ॥

विरहाकुल सखी असें उदासी
असेल चिंतीत प्राणसख्याशीं
भानहि तिजला नसेल उरले, द्या कांही उःशाप ॥ १ ॥

नसेल मुनीवर तिनें पाहिलें
शद्ब न अपुलें तिनें ऐकिलें
नका एवढे कठोर होऊं ना द्या असला शाप ॥ २ ॥

शरीर कोमल चित्त भाबडे
त्यांत विरहिणी अशीं सांपडे
दया दाखवा अजाणतेला सखी असे निष्पाप ॥ ३ ॥

अनादराचा मुळीं न हेतू
व्यथित जाहलें चित्त परंतू
कशास देता मुग्ध कळीला ह्या शापाचा ताप ॥ ४ ॥

थोर तपस्वी आपण मुनीवर
प्रभाव अपुला असें भयंकर
सौभाग्याला जातील जाळित विरहाचे आलाप ॥ ५ ॥

शाप आपुला ठरवील खोटे
सत्य असें जे घडलें येथें
सत्याहून मग असत्य सत्यच पुण्याहुनही पाप ॥ ६ ॥

× × ×

दुर्वास :

अलंकार पाहतां खुणेचा
पटल दूर हो विस्मरणाचा
आणि पुनरपी जागृत होतील स्मृतीच आपोआप
देतसे हा बाळें उःशाप ॥ ७ ॥

सनाम मुद्रिका तुझी बघत काळ कंठीते
नयनीं साठल्या जळी दृष्टी भाग्य शोधिते ॥ ध्रु ॥

मी वनांत प्रणयीनी राजमंदिरांत तूं
व्यथित मी इथें अशी जाणशी व्यथा न तूं
निसर्ग हा न थांबतो दैवही न थांबते ॥ १ ॥

प्रणयनिपुण हे नृपा ! मधुर कोष हा फुलें
रसज्ञ तूं तुझेंच वेड हृदय नाचते खुळें
स्वप्न स्वप्न रंगवीत स्वप्नसृष्टी रंगते ॥ २ ॥

विनयशील हे नृपा ! वचन तूं दिले मला
राजमंदिरी सुखांत आठवे न कां तुला
माझिया समोर सर्व 'ते' प्रसंग तेवते ॥ ३ ॥

लोकपालका नृपा ! चित्त कंप पावते
या वसंत वैभवांत मी स्वत:स जाळीते
मीलनांत सांधले स्वप्न भंग पावते ॥ ४ ॥

पौरवा ! तुवा दिली सनाम मुद्रिका तुझी
कां प्रसंग नाठवे विस्मरे स्मृती तुझी
विरहिणी तुझी इथें रात्र रात्र स्फुंदते ॥ ५ ॥

भासतो इथें मला आसमंत हा उदास
राजमंदिरीं तुझा काय चालला विलास
बावरून मी अशीं आंसवांत नाहते ॥ ६ ॥

दैवच करीते साथ सदोदीत
पूस आंसवें हो आनंदित ॥ धृ ॥

गुलाल उधळून पूर्व दिशेला
मंगलक्षण हा मुली उगवला
स्थिरचर अवघे झाले हर्षित ॥ १ ॥

आनंदाच्या लहरी लहरी
दिशा व्यापिती मंगल प्रहरीं
सुखें सुगंधित आली सुखवित ॥ २ ॥

" पर्णकुटीप्रत भाग्य धांवलें
तुझ्या मीलनीं धन्य पावलें "
दैवीवाणी मज ये सांगत ॥ ३ ॥

यज्ञामध्यें पडे आहुती
जरी धुरानें डोळें भरती
यजमानाचें कार्य यथोचित ॥ ४ ॥

सत्शिष्यातें विद्यादानीं
गुरू कधीही खंत न मानी
उचीत ते कां म्हणूं अनूचित ॥ ५ ॥

जे घडते ते दैव घडविते
कोण तयाला रोखूं शकते ?
ही दैवाची कृतीच इच्छीत ॥ ६ ॥

पतिगृहा तुज आज जायचे
क्षण आलें बघ मांगल्याचें
कशास चिंता हो आनंदित ॥ ७ ॥

## अनसूया व प्रियंवदा : १२

सखी निघाली आज सासरीं ॥ धृ ॥

मनास ताजी फुटे पालवी
रूप सखीचे खुले लाघवी
हिचेच यौवन हिला लाजवी
तरंग नवखे उरीं ॥ १ ॥

साधी भोळी मुळांत हळवी
प्रीत मनींची मनांत दडवी
संभ्रम वेडे मनास मळवी
आंसू नयनांतरीं ॥ २ ॥

हे वनदेवी ! देई भूषणें
सखीस अपुल्या आज सजविणें
सौंदर्याला काय अर्पिण ?
सौंदर्याचें वरी ॥ ३ ॥

चला तापसी चला तपस्वी
हर्ष नाचतो पहा मनस्वी
आशीर्वच द्या, हिला यशस्वी
होणें जन्मांतरीं ॥ ४ ॥

तरूवरांनी दिलीत वसनें
दिली लतांनी सुगंध सुमनें
अळीत लावुनी चोळू चरणें
आभरणें तनुवरी ॥ ५ ॥

नवीन वसनें नवी भूषणें
त्यांत अनावर हिला लाजणें
रम्य सोहळा अम्ही पाहणें
डोळे भरूनी परी ॥ ६ ॥

हो महादेवी प्रीयपतीची
माता हो तू वीर सुताची
वचनें ही तापसी जनांची
सखी मानसीं धरीं ॥ ७ ॥

जरी सखीचा विरह व्हायचा
विचार तिचीया मनीं सुखाचा
हा क्षण अवघा मांगल्याचा
अवघ्या चिंता हरी ॥ ८ ॥

आसमंत : १३

थांब ! थांब !!
क्षणभरी थांब ॥ धृ ॥

वृक्ष : थांब ! थांब !!
ममतेनें भिजलें अंग
मायेचा जडला संग
थांब ! थांब !! ॥ १ ॥

वेली : थांब ! थांब !!
तुझ्यामुळें सुचलें फुलणें
फुलून सुगंधी हे हंसणें
थांब ! थांब !! ॥ २ ॥

हरिणशावक : थांब ! थांब !!
रुचीर कंवळ तूं मुखी दिला
वात्सल्याचें भाग्य मला
थांब ! थांब !! ॥ ३ ॥

मयूर : थांब ! थांब !!
सजल घनापरी हर्ष दिला
तूं निघतां विसरेंच कला
थांब ! थांब !! ॥ ४ ॥

कोकिळा : थांब ! थांब !!
वासंतिक हा बहार तूं
मला स्फुरविशीं कुहुं कुंहुं
थांब ! थांब !! ॥ ५ ॥

आसमंत : थांब ! थांब !!
तुझ्यामुळें वैभव खुललें
भाव सजीवसे हे बनलें
थांब ! थांब !! ॥ ६ ॥

मृदुल सुखावह सुरभितही
वाट सुशीतल निर्भयही
थांब ! थांब !! ॥ ७ ॥

कृतज्ञ आम्ही सुखी रहा
असेंच प्रेमळ भाव वहा
आम्हांपासुनी जाशीं लांब
जाशीं लांब ॥ ८ ॥

आनंदच हा तुझ्या रूपानें निघें आज येथून
उदास छाया कशीं पसरली येती नेत्र भरून
या वेली, हे वृक्ष, पाडसें, सख्या तुझ्या व्याकूळ
जरी सुखाची कडा प्रीतीला तूंहि विरहाकूल ॥ १ ॥

× × ×

वृक्षवल्लरीनों ! बाला निघे सासुरास
पूर आज नयनीं येई वेग आंसवांस
तुम्हांवरी केली माया होय एकजीव
भावभावनांना करूनी चालली सजीव ॥ २ ॥

थांब शावका ! कां होशीं हा असा अधीर
तुझ्यावरी वात्सल्यघना बरसले अपार
काय प्रेम तोडू शकते धार आंसवांची ?
नको खंत वेड्या ठेवी स्मृती ही सदाची ॥ ३ ॥

चला आवरा हे आंसू धीर द्या सखीला
शकुंतला बाला निघते आज सासुराला
काय भान नुरलें मजला, मीहि नेत्र ओला
पुसा नेत्र, मांगल्याची टळूं नये वेळा ॥ ४ ॥

शकुंतले बाळे असशीं खरी भाग्यवंत
पती तुला लाभे बाळे असा पुण्यवंत
दैवजात अवघ्या गोष्टीं कळाव्या कुणाला
दुःख सर्व विसरून अपुल्या समजवी मनाला ॥ ५ ॥

आश्रमास सोडून निघता राजमंदिरांस
कृतीनें करावे सार्थ गृहिणीपदास
ठेव प्रेम आदर माया निगर्वी राहा तूं
जरी पट्टराणी होशीं राजमंदिरी तू ॥ ६ ॥

ऋषीकुमारानीं सांगा नृपा दोन गोष्टी
" राजमंदिरीं ये बाला ठेव प्रेमदृष्टी "
तुझें घराणें राजाचें थोर भाग्यवंत
आश्रमांत संयम आम्हां धन गमे अनंत ॥ ७ ॥

सासुरांस जाते बाला—फेड ही ऋणाची
जरी वाढली ही येथें ठेव ही दुज्याची
आज येथ विरहासंगें सौख्य खेळताहे
आणि चित्त हर्षासंगें व्यथा साहताहे ॥ ८ ॥

" शुभास्ते पंथानः सन्तु " ॥

## शचितीर्थ : १८

अंवती भंवती ते फिरते
परी दैव लोचना ना दिसते ॥ धृ ॥

जें घडले ते घडले रे
घडायचे ना दिसते रे
काळासंगें ते फिरते ॥ १ ॥

खाली निर्मळ पाणी हे
वरती निर्मळ नभ राहे
वादळ होऊनी कधीं फिरते ॥ २ ॥

या नयनीं जें प्रेम वसें
त्यांतुन अग्नी कधीं बरसे
अग्नीविण जीवन जळते ॥ ३ ॥

ललाटरेषा या भाळीं
जन्मा आधीं लिहिलेली
दैवच ते वाचूं शकते ॥ ४ ॥

शकुंतले बाळे असशीं खरी भाग्यवंत
पती तुला लाभे बाळे असा पुण्यवंत
दैवजात अवघ्या गोष्टीं कळाव्या कुणाला
दुःख सर्व विसरून अपुल्या समजवी मनाला ॥ ५ ॥

आश्रमास सोडून निघता राजमंदिरांस
कृतीनें करावे सार्थ गृहिणीपदास
ठेव प्रेम आदर माया निगर्वी राहा तूं
जरी पट्टराणी होशीं राजमंदिरी तू ॥ ६ ॥

ऋषीकुमारानों सांगा नृपा दोन गोष्टी
" राजमंदिरीं ये बाला ठेव प्रेमदृष्टी "
तुझें घराणें राजाचें थोर भाग्यवंत
आश्रमांत संयम आम्हां धन गमे अनंत ॥ ७ ॥

सासुरांस जाते बाला—फेड ही ऋणाची
जरी वाढली ही येथें ठेव ही दुज्याची
आज येथ विरहासंगें सौख्य खेळताहे
आणि चित्त हर्षासंगें व्यथा साहताहे ॥ ८ ॥

" शुभास्ते पंथानः सन्तु " ॥

शचितीर्थ : १८

अंवती भंवती ते फिरते
परी दैव लोचना ना दिसते || धृ ||

जें घडले ते घडले रे
घडायचे ना दिसते रे
काळासंगें ते फिरते || १ ||

खाली निर्मळ पाणी हे
वरती निर्मळ नभ राहे
वादळ होऊनी कधीं फिरते || २ ||

या नयनीं जें प्रेम वसें
त्यांतुन अग्नी कधीं बरसे
अग्नीविण जीवन जळते || ३ ||

ललाटरेषा या भाळीं
जन्मा आधीं लिहिलेली
दैवच ते वाचूं शकते || ४ ||

दैव कुणा ने उच्चपदीं
कुणा तुडविते सहज पदीं
दैव जीवना वल्हविते ॥ ५ ॥

देव असो वा दैत्य असो
कनिष्ठ वा कुणी श्रेष्ठ असो
दैवाशीं सारे नमते ॥ ६ ॥

जन्मभरीची साथ असें
कोण बरे टाळील कसें
पदोपदीं ते वावरते ॥ ७ ॥

जे घडले ते घडले रे
घडायचे ना दिसते रे
आशेंवर जीवन जगते ॥ ८ ॥

कां कमलकोष तुज रुचला, भ्रमरा ऽ ऽ ऽ          ॥ धृ ॥

आम्रमंजिरीं साधीभोळी
वासंतिक वैभवांत न्हाली
तुझ्या गुंजनीं भान विसरली
विसरलास कां तिला          ॥ १ ॥

सौंदर्याचें करूनी पूजन
मधुर कोष कां अपुरा शोषुन
चंचलता तंव जाई मोहुन
चुंबित नवतीला          ॥ २ ॥

आठवते मज ते मधुगुंजन
ती प्रीतीची मोहक गुंफण
सहज सहज मी गेले मोहुन
कां न स्मरे तुंजला          ॥ ३ ॥

अजुनी नाही वसंत सरला
मधुर कोष मी अजुनी जपला
साद घालीते तंव प्रीतीला
प्रीत अर्पिण्याला ॥ ४ ॥

रसिक कुणी कां मध्येंच सोडी
मुक्त प्रीतीची अवीट गोडी
कमलकोष कां तुला न सोडी
बंधनीं तूं रमला ॥ ५ ॥

कोण कारणें नगरा आले हे आश्रमवासीं ॥ धृ ॥

दुष्ट कुणी कां याना छळीती
तपांत अथवा विघ्न आणिती
अभय तापसी काय याचिती
शंका या मानसीं ॥ १ ॥

आश्रमांत त्या श्रेष्ठ मुनीवर
कार्य जयांचें सदा शुभंकर
पाप कुणाचे तिथें भयंकर
सत्कर्मानाशीं ॥ २ ॥

तपोवनांतील निसर्ग हंसरा
मुक्त पशू खग मुक्त पसारा
तिथें साधका शांत निवारा
कां मग आले ऋषीं ॥ ३ ॥

काय बहरणें तरू विसरलें
वा न लतांनीं पुष्प प्रसवले
रुष्ट पशू खग काय जाहले
कुठल्या पापें अशीं ॥ ४ ॥

शंकाकुल मन तरीहि उत्सुक
असेल आज्ञा कांहिं सहेतुक
पौरव मी तर आज्ञापालक
सेवक सर्वांशी ॥ ५ ॥

स्वागत यांचे घडो यथोचित
पुण्यकाल हा प्रगटे अवचित
राजमंदिरीं आज अकल्पित
हे आश्रमवासी ॥ ६ ॥

शारङ्गरव :                                                                                                                     १८

स्वीकार हे दान ! स्वीकार हे दान !!
स्वीकार हे दान !!! स्वीकार....                                   ॥ धृ ॥

आश्रमवासीं अम्ही मुनीजन
कण्वमुनींचें आज्ञापालन
म्हणुनी आलो नगरा राजन
अर्पिण्यास हे दान                                                  ॥ १ ॥

सकळ जगीं तव अपूर्व महती
श्रेष्ठकुळीचा तूं तर नृपती
शकुंतला साक्षात संस्कृती
नृपा सुयोग महान                                                  ॥ २ ॥

मनीं कासया शंकित होशीं
प्रसन्न होऊन कण्व महिर्षी
तुला अर्पिती हे राजर्षी
निज कन्येचें दान                                                  ॥ ३ ॥

सुकोमला निष्पाप कन्यका
घे स्वीकारून लोकपालका
भाव तुझा कां हो न बोलका
काय बरें अनुमान ॥ ४ ॥

नृपा तूं तरी सर्वज्ञानीं
कां मग ऐशीं अबोल वाणीं
कसें कांहीं तंव ये ना ध्यानीं—
कीं विस्मरणाची वाण ॥ ५ ॥

प्रत्यक्षच घे हिला पाहुनी
जागृत होतील प्रसंग नयनीं
सुखें मधुरतील अंतःकरणीं
तुझेच तुजला दान ॥ ६ ॥

मांगल्याची ही तर वेळा
सुखासुखांचा प्रगटे मेळा
अमृतमय कर या समयाला
हे स्वीकारून दान ॥ ७ ॥

तुझीच भार्या तुझ्या मंदिरा
येतां, संभ्रम कसा नृपवरा
तुझ्याविना हिज कुठें आंसरा
हिला न दुसरे स्थान ॥ ८ ॥

स्मरणावरती विस्मरणांनें मात कशीं केली
शापित झालो मीच काय वा मती भ्रष्ट झाली        ॥ धृ ॥

काय बोलतां हिचिया कधीं मी रमलों प्रणयांत
प्रसंग एकहि कसा न येतो माझ्या स्मरणांत
समोर असुनी प्रिया कशीं मग ओळख ना पटली    ॥ १ ॥

थोर तपस्वी आपण मुनिजन कां मज आरोपितां
पावित्र्याला माझ्या कां हो हे दूषण लाविता
असें कल्पुनी भलतें कांहीं व्यथित मनें केलीं     ॥ २ ॥

जरी मानिले सत्य क्षणभरीं अपुल्या वचनाला
गर्भवतीची सर्व लक्षणें दिसतीं नयनाला
कुणी बरें निष्ठूरपणें हिज अपमानित केली        ॥ ३ ॥

अलौकिक सौंदर्य मना या मोह जरी घालते
तरी संयमी पौरुष माझें मुळीहि ना भाळते
मला न स्मरते हिला कधीं मी असेल कां पाहिली    ॥ ४ ॥

परनारीला अपुली म्हणणें न्यायनीतिचें नसें
अपुल्या शद्बाखातर हिजला स्वीकारू मग कसें
दुष्ट कुणी ना अजुन निपजला ऐसा पौरुव कुळीं ॥ ५ ॥

कशीं पोसते पिलास अपुल्या माहित कां कोकिळा
धूर्तपणा हा स्त्रीजातींतील इथें प्रगटला खुळा
मोह न भलतां मनास शिवतो कधींच माझ्या मुळीं ॥ ६ ॥

कशीं पटावी ओळख मुनीवर अनोळखी जे असें
निष्कपटाला कपट कोठलें ठाऊक व्हावे कसें
दरड कांठची नदीच कापें गढूळतां ये जळीं ॥ ७ ॥

## शारङ्गरव :                                                       २०

जिला न माहित कपट कधींहि ती कपटीं कां ?
कपट दडवुनी मनांत, फसवी तो साधूं कां ॥ धृ ॥

जिच्या रूपाला मोहित होऊन अपुले केले
जिच्या प्रीतिला अनुरागानें स्वीकृत केलें
कण्वमुनींची ही तर कन्या विस्मरशीं कां ॥ १ ॥

थोर मनानें प्रसन्न होऊन तुंज अर्पियली
तीच सत्कृती आज अशीं कां निष्फळ ठरली
दैवीवाणीं वदली जे, तें असत्य हो कां ॥ २ ॥

धर्मशील तूं, कशीं जाहली अबोल वाणी
अधर्म हा तर घडला कां तो ये ना ध्यानीं
मातृपदाची वाट चालते, ही न कळें कां ॥ ३ ॥

ऐश्वर्याच्या मिजाशींतला धुंदपणा हा
जाण असुनही अजाणतेचा साज असे हा
विवाहितेला पतीगृहाविण स्थान उरे कां ॥ ४ ॥

रक्ष हिला वा त्याग हिचा कर हे तव हातीं
दुर्दैवाचा प्रहार हा तर हिंचिया माथीं
अधःपात हा अरे पौरवा ! तुझा असा कां ॥ ५ ॥

## शकुंतला : २१

‘ आर्यपुत्र !’ (थांबते)
पौरवराज ऽ ऽ ऽ
राखा, राखा माझी लाज ॥ ध्रु ॥

आश्रमकन्या मी तर भोळी
आल्ये अपुल्या राजमहालीं
पाहुनहि पण ओळख माझी—
कशीं पटेना आज ! ॥ १ ॥

तपोवनीं ज्या घडल्या गोष्टीं
दिलीत वचनें, का ती खोटी ?
प्रसंग एकहि कसा न स्मरतो—
तुम्हांस पौरवराज ॥ २ ॥

सत्य मानुनी अपुली वचनें
फसलें मी कां अशा तऱ्हेनें
स्वार्थी कैसें संबोधावे—
तुम्हांस पौरवराज ॥ ३ ॥

जळावरी शैवाल जमावे
मधुवचनीं कां जहर मिळावे
धर्मशील तुम्ही कसा लपवितां—
अधर्म पौरवराज ॥ ४ ॥

कसें आपणा पटवूं सारे
भाव आपुले दिसता न्यारे
कलंकिता कां मला लेखिता—
फुकाच पौरवराज ॥ ५ ॥

विस्मृतीच कीं, की हे नाटक
तुम्हांविना मज कुणी न तारक
तुम्हीच माझ्या सौभाग्याचे
दैवत पौरवराज ॥ ६ ॥

परनारी कां मला मानता
कशास शंका भलती घेतां
मी नच कपटी, कलंकिता ना—
मी हो पौरवराज ॥ ७ ॥

पाहुन ही तर लोकपालका
तुम्ही दिलेली मला मुद्रिका
पटेल ओळख, ह्या साक्षीनें
कां हो पौरवराज ॥ ८ ॥

× × ×

दैवच माझें मला छळें कां
कुठें हरवली कशीं मुद्रिका
शाप कुणाचा असा भयंकर—
कळें न पौरवराज ॥ ९ ॥

कशीं पटावी ओळख आतां
कुणीं न उरला माझा त्राता
आश्रम ना, ना राजमहालहि—
उपेक्षितां मी आज ॥ १० ॥

पौरवराज ऽ ऽ ऽ ऽ
राखा ऽ ऽ ऽ ऽ राखा माझी लाज.

धरणीमाते ऽ ऽ ऽ !
घे उदरीं मज घे उदरीं || धृ ||

जरी नसे मी कलंकिता मी कलंकिता ठरलें
नाही आश्रम नाही आश्रय एकटीच उरलें
अश्रू अश्रू तुला सांगतील मूक कहाणी खरी || १ ||

सत्यालाहि मोल न उरले असत्य विजयी ठरे
पावित्र्याला कसें आणि कां मोल न कांहीं उरे
तुंवा पाहिल्या घडल्या गोष्टी–तूं तर जवळी करी || २ ||

आक्रोशाला मोल न उरले कुठें न जागी दया
स्मृतीच जेथें दगा देतसे कसे पटावे तया
धगधगत्या या जिवंततेला शांत जरा तूं करी || ३ ||

उघड्यावरती गर्भ पोटिचा साहील साऱ्या व्यथा
भविष्यांतल्या ऐश्वर्याची ठरेल कां ही कथा
पुरुवंशाचा अंश वाढता, जन्मापूर्वीं अरी || ४ ||

तूंहि अशी कां क्रुद्ध, कुणी ना माझें कैसे उरे
या देहीची जिवंतता पण अज्ञातांतुन विरे
उपेक्षितेच्या वाट्याला ही, प्रतारणा ये खरी ॥ ५ ॥

माझ्यासाठीं द्रवेल हे नभ आशा कैशीं धरूं
धरणीमाते तुझ्याविना मी कुणा प्रार्थना करूं
निसर्गांत ज्या रमले, माझें दु:ख तो हि ना हरी ॥ ६ ॥

उघड्यावर मी अशीं जन्मलें उघड्यावर वाढलें
गर्भ वाढवीत उघड्यावर मी आज अशीं चाललें
अपमानित ही तनू सजविती हे अश्रूं भर्जरी ॥ ७ ॥

रखरखत्या दु:खांत बहरती स्मृती अजूनहि कशा
अग्नीमधुनी सतेज व्हावा स्वर्णशलाका जशा
शापित माझ्या सौभाग्याला मुक्त कुणी ना करी ॥ ८ ॥

वर्तमान ना शकेल सांगू–भविष्य कैसे असे
दैवच माझे माझ्यावरती कठोर होऊन हंसे
असह्य झालें सगळे सगळे घे माते उदरीं ॥ ९ ॥

कोतवाल १ ला : राजाची चोरूनी अंगठी विकशीं बाजारीं रे !
२ रा : श्रीमंतीची वाट एवढी साधीं असते कां रे !

कोळी : नसे चोर मी नव्हे चोर मी
कधीं न रमलो असल्या कामीं
मी तर कोळी विकतो मासे
परंपरागत चाले ऐसें

कोतवाल १ ला : चोरांच्या शद्बावर कोणी विसंबतो का रे !
२ रा : श्रीमंतीची वाट एवढी साधी असते कां रे

कोळी : तुम्हां सांगतो खरी कहाणी
कधीं न केली चोरी अजुनी
रोहित मासा कांपीत असता
उदरीं त्याच्या तेज प्रसवता

कोतवाल १ ला : तूं लोभाचा धनी होऊनी निघशीं बाजारीं रे
२ रा : श्रीमंतीची वाट एवढी साधी असते कां रे

कोळी : मिळेल जे जे ते ते विकणें
हा तर धंदा आणिक जगणें
मोल कशाचें कशास शोधूं
अजाण मी ना संधीसाधू

कोतवाल १ ला : संधी नामी तुला सुळावर आतां चढणे बा रे
२ रा : श्रीमंतीची वाट एवढी साधी असते कां रे

कोळी : दैवच केवळ असें नियंत्रक
कोठे तारक कोठे मारक
कुणास वैभव दे अविनाशीं
कुणास बनवी वा वनवासी

कोतवाल १ ला : हा दैवाचा खेळ जरी—पण कर्म तसे फळ रे
२ रा : श्रीमंतीची वाट एवढी—साधी असते कां रे ॥

× × ×

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२८४ काव्य
२११४०
शाखा

राजा : सोडा याला, दान करा धन
आज प्रगटला मौलिकसा क्षण
आज मुद्रिका पडता हातीं
स्मृती प्रगटल्या सरे विस्मृती

× × ×

कोतवाल १ ला : सुळावरी जो चढायचा त्या लाभे अंबारीं रे
२ रा : श्रीमंतीची वाट एवढी साधी असते कां रे

दुष्यंत : २५

मला व्यथांचें झाले ओझे
चुकलें ऽ ऽ माझे – माझें ॥ धृ ॥

असें कसें हे घडले कां पण
व्यथा वाढवित आला हा क्षण
निरपराध तूं आता कळले ऽ ऽ
चुकलें ऽ ऽ माझे – माझें ॥ १ ॥

शुद्ध प्रीतीचे ते आलिंगन
अभिवचनांनी भरले लोचन
कशीं विस्मृती मजला घडली ऽ ऽ
चुकले ऽ ऽ – माझे – माझें ॥ २ ॥

प्रीतीच्या पटवीत खुणा तूं
राजमंदिरी आलीस परंतू
निर्दयतेनें दूर सारीलें ऽ ऽ
चुकले ऽ ऽ माझे – माझे ॥ ३ ॥

आज मला ते प्रसंग स्मरती
स्मृती जागली – सरे विस्मृती
वंश वाढविशी उघड्यावर तूं ऽ ऽ
चुकलें ऽ ऽ माझें – माझें ॥ ४ ॥

दिलीस मजला शुद्ध प्रीत तूं
व्यथा दिल्या मी तुला परंतू
पश्चातापीं आक्रोशें मन ऽ ऽ
चुकलें ऽ ऽ माझें – माझें ॥ ५ ॥

आश्रम सुटला सुटे आसरा
राजमंदिरीं दिला न थारा
निसर्ग उघडा सांभाळील कां ऽ ऽ
चुकलें ऽ ऽ माझें – माझें ॥ ६ ॥

असशील कोठे – असशील कां पण ?
शंका भलती – भिजती लोचन
मी अपराधीं – मी अपराधी ऽ ऽ
चुकलें ऽ ऽ माझें – माझें ॥ ७ ॥

## मातली : २५

मातली मी मातली – देवेंद्राचा सारथी
देवेंद्रांची आज्ञा म्हणुनी आलो भूवर भूपती ॥ धृ ॥

आवर आपला बाण नृपवरा
आवर आपुला त्वेष – आंवर आपुला त्वेष
ज्ञात जाहलें पुरे मला रे
तुझ्या मनींचें क्लेश – तुझ्या मनींचे क्लेश
पराक्रमास्तव सिद्ध व्हायचे – धनुष्य घे हातीं ॥ १ ॥

मत्त जाहलें ' दुर्जय ' दानव
करावया संहार – त्यांचा करावया संहार
देवेंद्राला अशक्य झालें
तूंच होय आधार – त्याला तूंच एक आधार
दुर्जय दानव संहारून ये – विजय तुझ्या हातीं ॥ २ ॥

सूर्य जरी हा स्वयंप्रकाशीं
चंद्रच करी तम नाश – राजन् चंद्रच करी तम नाश
पराक्रमाचा तुझ्या वाटतो
देवेंद्रा विश्वास – राजन् देवेंद्रा विश्वास
यशोगीत तव अखंड गातील
स्वर्ग आणि धरती ॥ ३ ॥

मन प्रसन्न झाले निसर्ग येथ प्रसन्न
हा बाहू स्फुरतो जागे काय शकून ॥ धृ ॥

देवेंद्र जाहला प्रसन्न माझ्यावरती
मी झालों विजयी दानव सारे हरती
मज गौरविलें निज आसन ते देवून ॥ १ ॥

मी प्रसन्न – भंवती निसर्ग हाहि प्रसन्न
या प्रसन्नतेंतून – प्रगटे मंगलगान
तापसी तपस्वी – बसले तप मांडून ॥ २ ॥

ही पर्वतराजी श्वापद वसती येथें
लव चित्त न होते भयकंपीत या येथें
कोणते मनोरथ येतिल आकारून ॥ ३ ॥

मन प्रसन्न जैंसे तैंसे विरहाकूल
मज शकून स्मरता – पहिला – मन व्याकूळ
निष्पाप सखीचे स्मरण असे होऊन ॥ ४ ॥

भोंवतीं बावरी नजर घेई मागोवा
मत् सखीस माझा निरोप कोणी द्यावा
विरहांत बिचारी असेल गेली सुकून ॥ ५ ॥

या प्रसन्न समयीं शंका भलती चित्तीं
आंसवे पापणी खाली झुकुनी बघती
माझाच वंश मी उघड्यावर सोडून ॥ ६ ॥

या प्रसन्न जागीं प्रसन्न प्रगटे घटिका
मत् सखीच माझा ताप करील हा हलका
कां विलंब – यावे आकारून शकून ॥ ७ ॥

सर्वदमना ऽ ऽ सोड सोड सोड
त्याला सोड सोड सोड ! ! ! ॥ धृ ॥

हा सिंहाचा छावा असला
असला सान तरी
क्रूर भयंकर, भलते साहस
कधीं न कोणी करी
तूं तर बालक नकोस त्याच्या
नादी लागू सोड – सोड सोड सोड ॥ १ ॥

वनराजाचा अंश लागला
सहज कसा हातीं
नकोस पिंजू केस तयाचे
क्लेश तया होती
सुटकेसाठीं सामर्थ्याची
शर्थ करी हा – सोड सोड सोड सोड ॥ २ ॥

नकोस उघडूं मुखा नको रे
नकोस मोजू दांत
क्रूर मुखांतें कसा घालिसी
अपुला कोमळ हात
नकोस पाहूं अंत तयाचा
पुरे पुरे हा खेळ – सोड सोड सोड ॥ ३ ॥

कुणा हंकारूं कुणा पुकारूं
मन हे घाबरलें
इथें तापसी आणि तपस्वी
तपाचरणीं रमलें
पुरुवंशाचा अंश साहसी
सत्य जरी बाळा – सोड सोड सोड ॥ ४ ॥

× × ×

दुष्यंत : सोड सोड सोड
याला सोड सोड सोड

अभय द्यायचें वन्यपशूंना
तू तर आश्रमवासीं

दयाशील अन् पुण्यशील रे
इथलें सर्व निवासी
अलौकिक तव शौर्य उमजले
सोड सोड सोड ॥ ५ ॥

रूप गोजिरे तेज हांसरे
साहस अंगांतलें
वनीं वाढते बाल रूपानें
कसें न कांहीं कळें
राजलक्षणें दिसती तुझिया
रक्तवर्ण हातीं–सोड सोड सोड ॥ ६ ॥

प्रबळ भावना वात्सल्याची
आज उरीं उसळें
निपुत्रिकाच्या मनीं अनोखे
सौख्य नवे उमले
समीप माझ्या असा जरा ये
तुजला कुरवाळू दे–सोड सोड सोड ॥ ७ ॥

तापसी : पुरुवंशाचा अंश इथें हा
उघड्यावर वाढतो

दुष्यंत : पुरुवंशाचे छत्र आज मी
वात्सल्यें धरीतो
नवजीवन हे घेऊन प्रगटे
आज नव्यानें काळ–सोड–सोड–सोड ॥ ८ ॥

## शकुंतला व दुष्यंत : २८

शकुंतला : ही दैवाची रीत विलक्षण
ही दैवाची रीत
विरहानंतर पुन्हां उमलली
नव गंधानें प्रीत ॥ धृ ॥

या दैवाच्या असंख्य किमया
कळें न केव्हां येती उदया
मृगयेस्तव मी वनीं विहरतां
विद्ध करी तंव प्रीत

शकुंतला : ही दैवाची रीत ॥ १ ॥

तपोवनांतील तपाचरण तें
यौवनगंधें भरले होते
दैवगतीनें तुझिया चरणीं
मोहीत झाली प्रीत

दुष्यंत : ही दैवाची रीत ॥ २ ॥

निसर्ग साक्षी घडल्या गोष्टीं
लज्जीत थरथर तुझिया ओठीं

शकुंतला : तुझी मुद्रिका पाहत चिंतीत
होते तुंज पूजीत ॥ ३ ॥

भान विसरलें तुझ्या चिंतनीं
आणि शापिले दुर्वासांनीं

दुष्यंत : त्या शापानें स्मृतीभ्रष्टशीं–
सखये झाली प्रीत ॥ ४ ॥

शकुंतला : अंश तुझा या उदरी वाहुन
राजमंदिरा आलें चालुन

दुष्यंत : कठोर माझ्या विस्मरणानें
केलें तुजशीं व्यथीत ॥ ५ ॥

शकुंतला : हा दैवानें केला कावा
आणि साधिला कठोर दावा
उःशापाचे पडले साधन
गळून शचितीर्थांत ॥ ६ ॥

दुष्यंत : दैव मांडितें विचित्र गोष्टीं
तुझी मुद्रिका मत्स्यापोटीं
स्मृती जागल्या पुन्हां मुद्रिका
येतां मम हातांत ॥ ७ ॥

आणि मनाला लक्ष वेदना
डसल्या तेव्हां कांहीं सुचेना

शकुंतला : उघड्यावरती गर्भ वाढवीत
फिरले आक्रोशीत ॥ ८ ॥

वात्सल्याला फुटला पान्हां
माय मेनका पुंसें लोचना
जन्म दिला मी या बाळाला
दूषण दैवा देत ॥ ९ ॥

दुष्यंत : कधीं न माझ्या स्वप्नीं आले
दैवानें हें असें घडविले
देवेंद्राची आज्ञा झाली
घुमले विजयी गीत ॥ १० ॥

त्या विजयाला गेलो विसरून
सर्वदमन हा सुंदर पाहुन

शकुंतला : दैव प्रगटलें सौभाग्याचे
लेणें ल्याली प्रीत ॥ ११ ॥

दुष्यंत–शकुंतला : तुझें न माझें नाहीं चुकलें
हे दैवाचें फांसें असलें
मीलनांत या कथा संपली
ही दैवाची रीत ॥ १२ ॥

2218 काव्य
27780
REFBK-0021140